
# मे २०२४ चे राशी भविष्य- वैशाख शुक्ल पक्ष आणि वैशाख कृष्ण पक्ष

**लेखक - अजय तनखीवाले**





२. पार्श्वभूमी: या महिन्यात गुरुपालट आहे. १ मे ला गुरु मेषेतून वृषभेत प्रवेश करतोय. गुरु मोठा ग्रह असल्या मुळे मोठ्या उलाढाली घडवतो.

उत्सव: १० मे अक्षय तृतीया, २१ मे नरसिंह जयंती, २३ मे बुद्ध पौर्णिमा


महत्वाच्या तारखा: पौर्णिमा – २३ मे, अमावस्या- ८ मे रोजी.

२.0: महिन्यातील गोचर ग्रह युती: १. मकरेत प्लुटो २. कुंभेत शनि ३. रवि, शुक्र, हर्षल मेषेत ४. राहू, नेपच्यून, बुध, मंगळ मीनेत. ५. केतू कन्या राशीत आहे.

१.२ – ८ मे रोजी ची कुंडली व २३ मे ची कुंडली


| ८ मे | २३ मे |
|---|---|
|   |   |

२.०: भविष्य-चंद्र राशी प्रमाणे: (आपल्या चंद्र राशी (भारतीय पध्दती) प्रमाणे वाचा)

| राशी | भविष्य |
|---|---|
| २. १ मेष राशी (Mesh):   | • *अ. स्वास्थ्य*<br>  ○ पूर्वार्धात तब्येत उत्तम असेल, उत्तरार्धात थोडी सांभाळा.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ○ ओळखीतून मित्र जमवाल आणि धनलाभ होईल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ○ हे चैनीचे दिवस आहेत. अमावस्येला कलह टाळा. |


| | |
|---|---|
| | ● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● प्रवासात पाकीट सांभाळा. उत्तरार्धात मात्र अचानक धनलाभ होण्याची शक्यता.<br>  ● गुरु धनस्थानी या वर्षात धन वर्षाव करेल. शनिची गुरुला साथ असेल<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● कौटुंबिक करमणूक होईल. घरात शुभ कार्य असेल.<br>● *फ . परदेश गमन*<br>  ● परदेश गमनाची चांगलीच शक्यता आहे. |
| २.२ वृषभराशी (Vrishabha):<br><br> | ● *अ. स्वास्थ्य*<br>  ● या महिन्यात स्वास्थ्य सुधारेल आणि गुरु ग्रहाच्या कृपेने ते सुधारत जाईल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ● पूर्वार्धात तरुणांना नशीब साथ देईल.<br>  ● नवीन उपक्रमाची पायाभरणी होईल.<br>  ● प्रॅक्टिस मध्ये जम बसेल.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● जोडीदाराची उत्तम साथ लाभेल.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● थोडी रिस्क घेणे ठीक पण फार नुकसानी करून घेऊ नका.<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● मुलांना मदत लागेल, ती करावीत.<br>● *फ . परदेश गमन*<br>  ● थोडीशी शक्यता आहे. |
| २.3 मिथुन राशी (Mithun):<br><br> | ● *अ. स्वास्थ्य*<br>  ● मधुमेह व इतर लठ्ठपणाचे आजारांपासून स्वतःचे रक्षण करा.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ● कलाकारांना प्रोत्साहन मिळेल.<br>  ● समाजात प्रतिष्ठा वाढेल. सन्मान होतील.<br>  ● पुढाकार घेऊन कामे हाती घ्या.<br>  ● फसवे कारभारां पासून दूर रहा.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● फारसे प्रेमप्रकरणात गुंतवणूक ठेऊ नका.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● उत्तम गुंतवणूकी होतील.<br>  ● मध्यस्थ अचूक माहिती देतील.<br>  ● कॉम्प्युटरचा छान उपयोग करून घ्याल.<br>  ● उच्च वर्गीय समाजाला लागतात त्या वस्तूत गुंतवणूक करा. |

| | |
|---|---|
| | ● *इ . कौटुंबिक*<br>    ● कुटुंबियां सोबत पर्यटन होईल.<br>    ● आई वडिलांची तब्येत सांभाळून रहा.<br>● *फ . परदेश गमन*<br>    ● नक्कीच परदेश दौरा होईल. |
| २.४ कर्क राशी (Karka):<br><br> | ● *अ. स्वास्थ्य*<br>    ● अपघात टाळावे.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    ● व्यवसायात प्रगती कराल. गुरु पालट झाल्याचा लाभ.<br>    ● तरुण मंडळी, स्पर्धां मध्ये भाग घ्याल, यश मिळेल.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    ● नव्या वास्तूत प्रवेश होण्याची शक्यता आहे.<br>    ● जोडीदाराला तुमचे वैयक्तिक छंद आवडतील.<br>    ● सुंदर प्रणयाची वेळ असेल.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    ● या महिन्यात तेजी सुरु होणार.<br>    ● शासकीय योजनांचा पुरेपूर लाभ घ्याल.<br>● *इ . कौटुंबिक*<br>    ● घरात उत्तम वार्ता योग आहे.<br>    ● तुमची मुलं उत्कर्ष करतील.<br>    ● आई वडीलांची तब्येत उत्तम असेल.<br>● *फ . परदेश गमन*<br>    ● जबरदस्ती करून उपयोग नाही.<br>    ● अचानक संधी मिळतील तेंव्हा नक्कीच जाल. |
| २. ५ सिंह राशी (Simha):<br><br> | ● *अ. स्वास्थ्य*<br>    ● नकळत घातपात होऊन, कापणे, भाजणे होऊ शकते.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    ● तरुणांना नोकरी लागण्याची शक्यता.<br>    ● सरकारी परीक्षा उत्तीर्ण व्हाल. नोकरीत स्थिरता येणार.<br>    ● वरिष्ठ साथ देणार.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    ● घरात विवाह सोहोळा होईल.<br>    ● जोडीदार साथ देणार.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी* |

| | |
|---|---|
| | ○ पूर्वी केलेल्या गुंतवणुकीचे फळ मिळेल.<br>○ जमीन खरेदी कराल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>○ कुटुंबातल्या गर्भवती स्त्रियांची काळजी घ्यावी.<br>○ आईची तब्येत सांभाळा.<br>• *फ . परदेश गमन*<br>○ देशा बाहेरचे काम पूर्ण होणार.<br>○ परदेशात गाजा वाजा होईल. तुमचे नावलौकिक वाढेल. |
| २. ६ कन्या राशी (Kanya):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>○ रोग राई पासून जपा.<br>○ धांदरटपणा करून अपघात करू नका.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>○ मनासारख्या घटना घडतील. बढती मिळेल.<br>○ राजकीय शत्रू शांत होतील.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>○ घरात उत्तम समारंभ होतील.<br>○ जोडीदारावर उगाच संशय घेऊ नये.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>○ कर्ज फेडून मालमत्ता आपली करुन घ्याल.<br>○ अमावस्येकडे धनवर्षाव होण्याची शक्यता.<br>• *इ . कौटुंबिक*<br>○ अत्याधुनिक क्षेत्रात मुलांना मदत लागल्यास करावी.<br>• *फ . परदेश गमन*<br>○ परदेशातून उत्तम कंत्राट मिळतील. |
| २.७ तूळ राशी (Tula):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>○ जुन्या व्याधी परत डोके वर काढतील.<br>○ पथ्य पाळावे लागेल. व्यायाम करून चरबी कमी करावी लागेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>○ नोकरीत उच्च पदावर पोहोचाल.<br>○ सरकार साथ देईल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>○ पत्नीची काळजी घ्या. संगणक शिकण्यात मदत करा.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>○ सरकारी योजनांतून लाभ  होईल. राजकारणी मदत करतील.<br>○ बुडालेले पैसे परत मिळतील. |

| | |
|---|---|
| | • कोर्ट तुमच्या पक्षात निकाल देईल.<br>• अमावास्येला खर्च वाढेल. पैश्याची उधळपट्टी होईल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>• आईची तब्येत उत्तम असेल.<br>• शैक्षणिक क्षेत्रात मुलं उत्तम कामगिरी करतील.<br>• *फ . परदेश गमन*<br>• शक्यता कमीच. |
| २. ८ वृश्चिक राशी (Vrishchika):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>• उत्तम स्वास्थ्य लाभेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>• स्वतःच्या चुका कमी करा. वेंधळेपणा होईल.<br>• नोकरीत अस्थिरता वाटेल पण पुढे संकट मिटेल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>• घरात सुवार्ता येतील. जोडीदार उत्तम साथ देईल.<br>• प्रेमप्रकरणे यशस्वी होतील.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>• मोठे चमत्कार होतील आणि संपत्ती मिळेल.<br>• चक्क लॉटरी सुद्धा लागेल.<br>• पडीक जमिनीतून घभाड मिळेल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>• प्रवासात काळजी घ्या.<br>• आईची तब्येत ठणठणीत असेल.<br>• मुलांना भरकटू देऊ नका.<br>• त्यांना शिक्षा नाही, मार्गदर्शन करा.<br>• *फ . परदेश गमन*<br>• परदेश गमनाची शक्यता कमी आहे. |
| २. ९ धनू राशी(Dhanu):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>• पूर्वार्धात काळजी घ्यावी.  संसंर्गजन्य बाधा येईल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>• कलाकारांना यश लाभेल.<br>• नोकरीत प्रगती होईल, बढती मिलेल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>• पौर्णिमा उत्सवाची असेल पण बेरंग होउ शकतो.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>• व्यवसायात मोठा फायदा होईल.<br>• जुन्या वास्तूत गुंतवणूक वाढवाल. |

| | |
|---|---|
| | ◦ नवीन वास्तू किंवा जमिनीची खरेदी होइल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>◦ मुलांना उत्तम शिक्षण संधी लाभेल.<br>◦ त्यांना आधुनिक तंत्रज्ञान शिकता येईल.<br>◦ भावंडां सोबत उत्तम वार्तालाप  होईल, विचारविनिमय कराल.<br>• *फ . परदेश गमन*<br>◦ परदेश गमन नक्कीच होईल. |
| २. १० मकर राशी (Makar):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>◦ उत्तम स्वास्थ्य लाभेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>◦ व्यवसायिक उलाढाल्या होतील.<br>◦ नवीन नोकरी मिळेल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>◦ तरुणांचे विवाह होण्याची शक्यता आहे.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>◦ मोठ्या गुंतवणुकी  होतील आणि भरघोस संपत्ती मिळेल.<br>◦ घरात आधुनिक यंत्रणा लावून सोयी वाढवाल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>◦ मुलांना उत्तम शिक्षण संधी लाभेल.<br>◦ भावंडात संशय कल्लोळ आणि भांडणं होऊ नयेत ही काळजी घ्या.<br>• *फ . परदेश गमन*<br>◦ संथ प्रगती होईल. |
| २. ११ कुंभ राशी (Kumbha):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>◦ उत्तम स्वास्थ्य लाभेल.<br>*ब . नोकरी/धंदा*<br>◦ कलाकारांना यश मिळेल, प्रसिद्धी मिळेल.<br>◦ नोकरीत पुढची वाटचाल उत्तम होणार अशी वार्ता मिळेल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>◦ महिना उत्तम जाईल. जोडीदाराची साथ मिळेल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>◦ वास्तू चिंता सुटेल, घर मिळेल. कर्ज मिळेल.<br>◦ विचार न करता, उगाच नको तिथे, पैसे फेकणे या प्रवृत्तीला आळा घाला.<br>◦ फसव्या गुंतवणुकी टाळा.<br>• *इ . कौटुंबिक*<br>◦ तुमच्या खेळकर स्वभाव मुळे तुम्ही भावंडात खूप लाडके व्हाल.<br>• *फ . परदेश गमन*<br>◦ परदेशी जायची फारशी शक्यता नाही. |

| | |
|---|---|
| २.१२ मीन राशी (Meena):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  • भाजणे, कापणे असल्या दुखापती टाळा.<br>  • जुन्या व्याधी परत डोकं वर काढतील<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  • पूर्वार्धात काळजी वाढेल, गुप्त चिंता वाढेल.<br>  • उत्तरार्धात नोकरीतला जाच कमी होईल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • पौर्णिमेनंतर दैवी प्रभावाने प्रिय व्यक्तीची चिंता जाईल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  • सरकारी आणि शासकीय कामे पूर्ण होतील.<br>  • तंत्रज्ञानाचा वापर करून कला निर्मिती (ए. आय. आर्टस्) असल्या क्षेत्रात गुंतवणुकी कराल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  • भावंडात बरोबर उत्तम जमेल.<br>• *फ . परदेश गमन*<br>  • शक्यता आहे. |
| | |